# वऱ्हाडसमाचार.

Regd-No. N 150

**Berar-Samachar.**

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख १७ माहे जानेवारा सन १९१६ ई० [ अंक ३


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.


### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मार्गेराहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नं. १

### असल अंगुरी.

# हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर ।॥= तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबेती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं. ९

नो. नं. २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळया

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी
नो. नं. ४

### अतिशय पौष्टिक व स्तंभक
## विलासिनी वटिका.

शक्ती येण्याकरितां व ती कायम टिकण्याकरितां एकदां वापरा. पहिल्याच दिवशीं गुणाबद्दल औषध घेणाराची खात्री. किं० बाटलीस १२ आणे. पूर्ण गुणास ३ बा. अ. पत्रक सोबत.

सकळकळे अन्ड सन्स
शहर आकोला.

त्वरा करा. **जंगी लूट** अपूर्व लाभ
### जानेवारी अखेर खर्च माफ.

उत्तम रंगदार निळीकाळी शाईच्या पुड्या पाव आणा दराच्या १०० रु. १। डायरी बक्षिस. पुडी २०० रु. २। कापडी डायरी. पुडी ४०० रु. ४ डायरी सोनेरी. इनाम न घेतां १००० पुडीस रु. ७॥

**गुण न आल्यास पैसे परत.**

वृद्धपण टाकून तरुणत्व प्राप्त करून घ्या.

## तरुण मित्र पाक

किं० २ रु०

केस काढणारा रमेश सोप ३ वड्यांचे पेटीस रु. १ दोन पेट्यास १॥। रु. चार पेट्यास रु. ३ आग न होतां डाग पडणार नाहीं. उत्तम सुवासिक आहे.

पत्ता — दयालदास लालदास आ. कं.
जंगी स्टोअर ब्रह्मणपूर
नो. नं. ५


## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः-** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडल.

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, पात भरल्याचे, लिस्टफार्म पर्च्याच व नकलेकारिता करावयाच्या अर्जाच नमून छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर


## श्री दत्तात्रय अलंकारालय
### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें सार्वी व बागन्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो. नं. ६

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह**
**पृष्टसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील नटेली, लंगोटे, छाछू करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवुन सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळाविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वैगेरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

# कोकशास्त्र अथवा
# जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेववें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. ३ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला——सोमवार तारीख २४ माहे जानेवारी सन १९१६ ई० [ अंक ४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मार्गेराहीक त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नं १

### अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## चांदीचींभांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. मात्र माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### अतिशय पौष्टिक व स्तंभक विलासिनी वटिका.

शक्ती येण्याकरितां व ती कायम टिकण्याकरितां एकदां वापरा. पहिल्याच दिवशीं गुणाबद्दल औषध घेणाराची खात्री. किं० बाटलीस १२ आणे. पूर्ण गुणास ३ बा. अ. पत्रक सोबत.

सकळकळे अॅन्ड सन्स
शहर आकोला.

### त्वरा करा. जंगी लूट अपूर्व लाभ

### जानेवारी अखेर खर्च माफ.

उत्तम रंगदार निळीकाळी शाईच्या पुड्या पाव आणा दराच्या १०० रु. १। डायरी बक्षिस. पुडी २०० रु. २। कापडी डायरी. पुडी ४०० रु. ४ डायरी सोनेरी. इनाम न घेतां १००० पुडीस रु. ७॥

**गुण न आल्यास पैसे परत.**

वृद्धपण टाकून तरुणत्व प्राप्त करून घ्या.

### तरुण मित्र पाक

किं० २ रु०

केस काढणारा रमेश सोप ३ वड्यांचे पेटीस रु. १ दोन पेट्यास १॥। रु. चार पेट्यास रु. ३ आग न होतां डाग पडणार नाहीं. उत्तम सुवासिक आहे.

पत्ता — दयालदास लालदास आ. कं.
जंगी स्टोअर बऱ्हाणपूर
नो. नं. ५

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः—** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकीलपत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्यांच व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें सार्थी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तार्टे, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं

## कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील नटेली, लंगोटे, छाछू करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवुन सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

पुढें जसजसा अनुभव येत गेला, तसतसा या शाळांच्या चालकाकडून विद्यार्थ्यांनीं नाटकें करण्याच्या संबंधांत अधिक कडक निर्बंध घालण्यांत आले व त्यानें हीं काम भागेना, तेव्हां नाटकें करण्याचा प्रघात या दोन शिक्षण संस्थांनीं आज कित्येक वर्षे अजीबात बंद केला आहे. या प्रमाणें या प्रश्नाचा इतिहास आहे या दोन शिक्षणसंस्थांच्या अनुभवाचा फायदा इतर कित्येक शिक्षणसंस्थांनीं ही घेऊन नाटक करण्याचा प्रघात बंद केला आहे. बंगाल्कडे हा प्रघात अद्याप आहे. तथापि सर रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतन नामक विद्यालयानें या प्रघातांत आणखी एक नवा प्रकार घुसडला आहे. तेथें विद्यार्थीच नाटक प्रयोगांत सामिल होतात असें नाहीं,] तर खुद्द अध्यापक ही या प्रयोगांत स्वतः रंग फासून अभिनयाचे कामीं विद्यार्थ्यांचे मार्ग दर्शक होऊं लागले आहेत. या विद्यालयाकडून या माघमासांत 'फाल्गुनी' नांवाच्या एका बंगाली नाटकाचा प्रयोग होण्याचें ठरलें आहे. या प्रयोगांत खुद्द सर रविंद्रनाथ टागोर व इतर अध्यापक विद्यार्थ्यांच्या बरोबरीनें नाटकांत अभिनय करणार असें कळतें. या नाटकाचें उत्पन्न बंगालांतल्या दुष्काळपीडितांच्या दुखःनिवारणाकडे जाणार आहे. उद्देश चांगला आहे, पण सत्कार्यास मदत करण्याचा हा मार्ग कितपत हितपरिणामी होईल या विषयींचा प्रश्न आहे. इकडच्या पेक्षां तिकडे निराळा अनुभव या नवीन सुधारणेमुळें येतो कीं काय हें पाहिलें पाहिजे.

---

## विलायतेंतले हिंदी विद्यार्थी

यंदाच्या राष्ट्रीय सभेनें जे नवे विषय हातीं घेतले त्यांतला एक अत्यंत महत्त्वाचा विषय विलायतेंतल्या हिंदी विद्यार्थ्यांचीं दुःखें हा होता. या विषयाकडे हिंदुस्थानचें लक्ष अद्याप जावें तसें गेलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. पण दिवसें दिवस या विषयाला जें निकडीचें स्वरूप येत चाललें आहे त्यावरून या विषयाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं असें दिसतें. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत विद्यार्थ्यांची स्थिति अतिशय कष्टमय होत चालली आहेच, पण विलायतेंत आपणांस हवें तसें उत्कृष्ट प्रतीचें शिक्षण मिळवितां येईल व आपण देशाच्या उन्नतीला हातभार लावूं अशा उमेदीनें हजारों रुपये खर्च करून विलायतेंस जाणारांची ग्रहदशा तेथें त्यांना अधिकच जाच करणारी होते हें पाहून मन अधिकच खिन्न होतें. नुकतेच विलायतेहून यशस्वी होऊन आलेले मि. जिवराज मेहता यांनीं आपल्या विद्यार्थी बंधूंचीं जीं दुःखें निवेदन केलीं ती अत्यंत हृदयद्रावक आहेत. तीं दुःखेंहीं--जे केवळ खोऱ्यानें पैसे ओढण्यास शिकण्यासाठीं (ब्यारिस्टर होण्यासाठीं) विलायतेस जातात त्यांची गोष्ट राहो, पण औद्योगिक व शास्त्रीयशिक्षण घेण्यासाठीं जातात त्यांच्याविषयीं सहानुभूति वाटली पाहिजे. या विद्यार्थ्यांचा अगोदर कारखान्यांतून प्रवेशच होत नाहीं. झालाच तर त्यांना व्यावहारिक शिक्षण मिळत नाहीं त्यासाठीं दोन दोन हजार रुपये देण्यास तयार होऊन ही तें शिक्षण न मिळतां त्यांना विन्मुख होऊन यावें लागतें. कित्येकांना तर येवढ्या मोठाल्या रकमा दिल्याबद्दल पश्चात्ताप होण्यासारखें शिक्षण देण्यांत येतें. स्टेट सेक्रेटरीच्या मार्फत हिंदुस्थानसरकार दरसाल पांच कोटि रुपयांचा माल विलायती कारखानेवाल्यांकडून खरीद करतें. अर्थात् येवढ्या मोठ्या गिऱ्हाईकाच्या उपयोगीं थोडें तरी त्या कारखानदारांनीं पडावें, पण तशी बुद्धि त्यांना होत नाहीं. स्टेट सेक्रेटरींनीं जपानी, चिनी, स्पानिश वगैरे सरकाराप्रमाणें हिंदी विद्यार्थ्यांसाठीं आपलें वजन खर्च करून हिंदी विद्यार्थ्यांकरितां सवलती मिळवाव्या, पण तें ही त्यांच्या हातून होत नाहीं. यासंबंधांत पुष्कळ चळवळ केल्यावर एक कमिटी नेमण्यांत आली, पण तींत या विद्यार्थ्यांचा एक ही प्रतिनिधि घेण्यांत आला नाहीं. हिंदी विद्यार्थ्यांची तक्रार रास्त आहे अशी कमिटीची खात्री झाली, व तिनें कांहीं सवलती मागितल्या पण तसें करणें शक्य नाहीं असें ह्मणून अंडरसेक्रेटरी साहेबांनीं त्यांच्या शिफारशीला वाटाण्याच्या अक्षता लाविल्या. हिंदी विद्यार्थ्यांच्या हितासाठीं ह्मणून सरकारानें एक खातें उघडलें, पण तें खातें उघडण्याचा उद्देश काय याची खबर ही स्टेट सेक्रेटरी साहेबांना नाहीं, पण त्या प्रित्यर्थ हिंदुस्थानला दरसाल एक लक्ष रुपये खर्च मात्र निष्कारण द्यावा लागत आहे! या खात्यानें हिंदी विद्यार्थ्यांच्या फायद्याची एकही गोष्ट गेल्या ६ वर्षांत केली नाहीं; उलट कॉलेजांतून हिंदी विद्यार्थ्यांचा प्रवेश होऊं नये या कमीं मदत केली! या खात्याची हिंदी विद्यार्थ्यांविषयीं नेहमीं संशयी वृत्ति असते. सारांश, हिंदी प्रजेचे नागरिकत्वाचे हक्कास हिंदी विद्यार्थी मुकण्याचा प्रसंग आलेला आहे. या दुःखाच्या अत्यंत हृदयद्रावक कहाणींतला एक चतुर्थांश भाग जरी खरा असला, तरी तो खऱ्या हाडाच्या इंग्रजास लाजिरवाणा आहे असें जें मि. हार्नीमन यांनीं ह्मटलें आहे तें सर्वथा खरें दिसतें. प्रस्तुतच्या युद्धामुळें इंग्रज जनतेचा हिंदुस्थानासंबंधानें दृष्टिकोन बदलत चालला आहे असें नुसतें सांगण्यांत अर्थ नाहीं. त्याचें प्रत्यक्ष प्रमाण कृतींत दिसल्यावांचून नुसत्या शद्बावडंबरानें कोणीं फसूं नये, आणि या बाबतींत नेटाची व जोराची चळवळ चालवून हिंदुस्थानचा आक्रोश इंग्रजांच्या न्याय बुद्धीस खडबडून जागी करील असें होणें अत्यंत अवश्य आहे. राष्ट्रीय सभेनें हा प्रश्न यंदा हातीं घेतला आहे. तिच्या प्रयत्नाला सर्व प्रजेकडून जोराचें साह्य मिळाल्याशिवाय तिच्या प्रयत्नाला यश प्राप्त होणें कठीण आहे.

---

## महायुद्धाचा रंग.

दर आठवड्याला युरोपांतल्या महायुद्धाचा रंग पालटत आहे. गेला आठवडा बारीक सारीक गोष्टींसंबंधानें बराच चळवळीचा गेला. जर्मन बादशहा (केसर विल्यम) हें बरेच आजारी आहेत व त्यांची बहीण व इतर आप्तसंबंधीं त्यांच्या भेटीसाठीं धावून गेले आहेत अशा तारा एकापक्षाकडून येतात, तर उलट पक्षाकडून असें ही जाहिर करण्यांत येते कीं केसर बरे झाले असून ते समरभूमीकडे रवाना ही झाले आहेत! खरा प्रकार काय असेल तो सर्वसाक्षी परमेश्वराला ठाऊक! कित्येक तर केसर बादशहा मरण पावल्यास पुढें काय होईल या विषयीं तर्क लढवीत बसले आहेत! कॉर्फ्यू हें बंदर तर दोस्त राष्ट्रांनीं आपल्या ताब्यांत घेतलेंच. तेथील आस्ट्रियन वकील व आस्ट्रियन लाइड कंपनीचा एजंट यांना कैद करण्यांत आलें आहे, अशी अधेवट सरकारी बातमी आहे. सार्बियन सरकारचें ठाणें स्कुटारीहून उठवून ब्रिंडिजी येथें नेण्यांत आलें आहे, व त्याबद्दल इटलीनें आनंद प्रदर्शित केला आहे. इटली सार्वियाला मदत करीत नाहीं अशी जी मध्यंतरी बातमी आली होती तिच्यावर या बातमीनें आतां विरजण पडेल. सालोनिका येथील दोस्त राष्ट्रांच्या फौजा पक्क्या बंदोबस्तानें राहिल्यां आहेत. तेथील ब्रिटिश व फ्रेंच फौजांचें सेनापत्य जनरल सारेल यांनीं आपल्या हातीं घेतलें आहे वर्डुन येथें ज्यांनीं जर्मन युवराजाला चांगला हात दाखविला तेच हे जनरल सारेल होत. ग्यालिशीयामध्यें निकराची लढाइ चाललीच आहे. या ठिकाणीं राशियन फौज करीत असलेल्या मर्दुमकीची फार तारीफ होत आहे. बेलज्यममध्यें जर्मन फौज सपाटून मार खात आहे. इकडे राशियानें ही तुर्कांची पाठ पुरविली आहे. पश्चिम रणक्षेत्र तोफांच्या गर्जनांनीं दुमदुमत आहे. ईजिप्तकडे इंग्रज लोकांपुढें आरबांचें कांहीं न चालल्यामुळें ते पळत सुटले आहेत. सारांश, जिकडे पाहावें तिकडे दोस्त राष्ट्रांची विजयपताका फडकत आहे.

---

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—शिशिर ऋतूची गुलाबी थंडी व दिवसाचा तीव्र ताप यांनीं सध्यांची समशीतोष्णता थोडी लवकरशी वाटते. मध्यंतरीं विरळ अभ्रेंही येतात. पीकें व बाजारभाव समाधानकारक असून या युद्धाच्या दिवसांतही थोडा अधीक आरामच आहे.

अलिशान नामदार सर बेंजामिन राबर्टसन हे वाशिमाहून रिठाड, रिसोड, मोप, हीं गांवें घेऊन येत्या रविवारीं लोणारास जातील आणि नंतर ता. १३ फेब्रुवारी पर्यंत बुलडाणे जिल्ह्यांत फिरणार आहेत. या दवऱ्यामध्यें शहरें वगळून वऱ्हाडच्या ग्रामसंस्थांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न दिसतो.

**प्लेगाचा दवरा**--निसर्गाच्या मंदिरांत जे आरोग्याचे नियम मोडतात त्यांस ताळ्यावर आणण्यासाठीं प्लेगाचा दवरा जिल्हाधारीनें खालील स्थळीं चालूं आहे. या अधिकाऱ्याचीं मौन–व्याख्यानें शिकवितात कीं सर्वांनींच आपली स्वच्छता एकदम अंमलांत आणावी आणि सहकारीत्वानें आपापलीं गृहें, ग्राम व शहरें हीं मनुष्याच्या देवपणाला शोभेल अशीं ठेवावींत.

| जिल्हा | दूषित स्थळें |
|---|---|
| **उमरावती** — | उमरावती, मोर्शी, बडनेरा, इलिचपूर, परतवाडा, शिरसगांव, खोलापूर व लहान लहान २६ खेडीं |
| **यवतमाळ**— | यवतमाळ व दारव्हा |
| **अकोला** — | वाशिम, आकोट, हिवरखेड, बारशीटाकळी, कारंजा, बाळापूर, पातुर व इतर ३१ खेडीं |
| **बुलडाणा**— | शेगांव, खामगांव व ७ खेडीं |

**आकाश सौंदर्य**—सूर्यास्ताचे तांबडे व सोनेरी रमणीय वर्ण पश्चिम क्षितीजाला विलक्षण रंगवितात अशावेळीं शुक्र आपल्या अनुष्ण प्रकाशाची वृष्टी करूं लागतो आणि त्याच्या खालीं मकर राशीच्या कुंभा जवळील अंशामध्यें बुध हा ग्रह आपल्या मंद प्रकाशानें आपली सूक्ष्म आकृती व्यक्त करीत आहे. बुधाचें दर्शन येत्या एकादशीपर्यंत सायंकाळीं एक घटकाभर दिसून पुढें बुधाचा अस्त होईल. शुक्रावर मीन राशीच्या पथांत गुरु हा ग्रह देखील पूर्ण तेजस्वी असून पृथ्वीवर अनुग्रह करीत आहे. त्याच्या पुढें पूर्व भागाला तो तेजःपुंज लुकलुकणारा व्याध पाहतांच त्याच्या उत्तर भागाला शनीची ओळख पडेल. आणि रात्रीचे नऊ वाज. ण्याच्या सुमारांत चंद्राच्या उत्तर भागाला मंगळ हा लाल तेजोगोल दिसूं लागतो- मंगळाची आकृती देखील मोठी आहे. या पुढील कृष्णपक्षाच्या रात्रीं तर हे ग्रह व इतर तेजस्वी तारे यांनीं आकाशाची शोभा इतकी हृदयंगम दिसेल कीं रात्रीची दोन घटका मौज पाहून नेत्रांचें साफल्य वाटेल.

हकीम महमद सइहूर रहिमान दिल्लीवाले हे येथें आले असून ते आपल्या वैद्यकींत फार कुशल आहेत असें सांगतात. त्यांचा विचार या शहरीं कांहीं महिने राहण्याचा असून महमद बशीरुद्दीन यांच्या फालीज रोगावर औषधोपचार करण्याचा आहे. गरजूंनीं अनुभव घेऊन पहावा.

रावसाहेब रामचंद्र विष्णु महाजनी हायकोर्ट वकील, आकोला यांनीं येथील मुनसिपालिटीच्या व्हाइस चेअरमनची जागा मंडळीच्या आग्रहास्तव पत्करली असून मुनसिपल कारभार पुनः नमुनेदार करण्याचा त्यांचा विचार आहे. स्वराज्याचा हा पहिला श्रीकार होय.

तात्कालिक औषधोपचार करण्याची विद्या शिकविण्याचे सेंट जॉन आंबुलंसचे वर्ग येथें काढण्यासाठीं जाहिर सभा गेल्या बुधवारीं भरली होती. आणि खानबहादुर विलायतुल्लाखान यांनीं या नव्या उपक्रमाचे लाभ सर्वांस समजाऊन सांगितले.

**स्वागत**— आमच्या प्रांताच्या प्रांतिक परिषदेचे डेप्युटेशनाची मुलाखत सर बेंजामिन यांनीं गेल्या १२ वे तारखेल घेऊन परिषदेच्या ठरावांचा स्वीकार करून युनिव्हरसिटी व प्राथमिक शिक्षण या विषयीं सरकारी अनुकूल योजना होत आहेत असें अभिवचन दिलें.

**युनिअन कांग्रेस**— मध्यप्रांताच्या व वऱ्हाडच्या सहकारी पेढ्यांची संयुक्त परिषद जबलपूर येथें गेल्या १९ व १६ तारखांस भरली होती तेव्हांच्या वादाविवादाला मुंबईच्या कांग्रेसच्या नव्या स्वराज्याच्या धोरणानें विशेष महती आली होती.

## जाहिर खबर.

सौथ आफ्रिकन रिलीफ फंडाच्या वर्गणीदारांची सभा ता. ३०।१।१६ रोजीं रावसाहेब रा. वि. महाजनी वकील अकोला यांचे घरीं सकाळीं ८ वाजतां खालील विषयांचा विचार करण्याकरितां भरविण्याचें ठरले आहे. सबब त्या वेळेस सर्व बर्गणीदारांना हजर राहण्याबद्दल विनंति करण्यांत येत आह. सभेपुढील विषयः—

१ फडाचा रिपोर्ट पास करणें.

२ फंडाच्या शिलकेचा विनियोग अगर व्यवस्था करणें.

अकोला. २०।१।१६

वि. दा. भट

चिटणीस सौथ आफ्रिकन रिलीफ फंड

नो. नं. ४३

## नोटीस

गोपी मर्द नामदेव शिंपी राहणार वरवटबकाल ता० जळगांव जि० बुलडाणें

ईस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी सखी चुलत भावजई आहे. ज्या वेळेस आमचा भाऊ नामदेव सखाराम यांनीं आपल्या मरण समयींच्या वेळेस येथील चार संभावित लोकांना बोलावून सांगितलें कीं मला पुत्र संतान नसल्यामुळें तुझ्या हयातीपर्यंत माझी असलेली स्थावर जंगम मिळकत याचा तूं उपभोग घ्यावा अगर आमचे भावंडापैकीं कोणाचाहि मुलगा दत्तक घ्यावा. परंतु जिनगीची गहाण खरेदी किंवा कोणत्याही तऱ्हेनें अफरा तफर करूं नये. असें सांगितलें होते. त्याचे मरण समयीं कर्ज वगैरे मुळींहीं नसून तूं एकटीच आहेत हल्लीं तूं विनाकारण कर्ज करून इस्टेटची अफरातफर करण्याचे तजविजीत आहेस तेव्हां असें करणें कायदेशीर होणार नाहीं किंवा केल्यास त्याजबद्दल योग्य रितीनें दावा आणला जाईल कळावे ता० २९।१२।१५

सही

मोतीराम चिंधाजी शिंपी हल्लीं राहणार वानखेड ता. जि. मजकूर

नो. नं. ४४

## नोटीस

नादार मकदमा नंबर १४६ सन १९१३

वादी अर्जदार

जेठमल लालचंद मारवाडी रा. खामगांव

प्रतीवादी विरुद्ध पक्षकार.

१ नवलमल चंदनमल तीवरी जि. जोधपूर.

२ दिपचंद रुपचंद रा. दिल्ही

३ माणकचंद कपूरचंद रा. दिल्ही माणीकचौक

४ नेमीचंद फुलचंद रा. दिल्ही कापड बाजार

५ नथमल पुकराज पालीवाला रा. दिल्ही ”

६ लखीचंद रामचंद मा. राजमल रामचंद रा० जळगांव खानदेश

७ लुंबाजी पद्माजी रा. करनुळ दक्षीण सोलापूर

८ व्यंकटलाल भय्या रा. सोलापूर

९ जगन्नाथ गिरधारीलाल रा. कलकत्ता कोठी नंबर ९४

१० मुरलीधर कालुराम बनारस जरी दुपटेवाला कपड बाजार

तुमचा मुकदमा आमचे कोर्टांत आकोल्याहून ट्रॅन्सफर होऊन आला आहे. त्याची चौकशीची तारीख १८ माहे ३ सन १९१६ ची नेमली आहे. तरी तुम्ही आपले सर्व जबाबासह वरील तारखेस सकाळीं १० वाजतां हजर राहावें. कळावें तारीख १३ माहे १ सन १९१६ इ.

टीपः— आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

R. N. Trivedi

सबजज्ज खामगांव.

नो नं. ४५

## नोटीस

ईश्वरदास **जमनादास मारवाडी** रा. कवळा ता० चिखली जि० बुलडाणा पो. आमडापूर

यांस:—

खालीं सह्या करणार यांचेकडून नोटीस देण्यांत येते **कीं** आमचे पक्षकार रामकीसन वा रामरतन व रामचंद्र वा कन्हयालाल याचे व तुमचे मौजे कवळा येथें जमनादास कन्हयालाल या नांवाचे शराकतीचे दुकान आहे. त्या **दुकानची** भागणी मोडून आमचे पक्षकार याचा त्या दुकानामध्यें असलेला हिस्सा हिशेब करून आमचे पक्षकार यांस देण्याविषयीं आमचे पक्षकार यांनीं तुह्मांस अनेक वेळां ह्मटलें परंतु तुह्मी आमचे पक्षकाराचे विनंतीकडे अद्याप लक्ष दिलेले दिसत नाहीं. तसेच तुमचे आमचे पक्षकार याचे उंद्री येथील दुकानचे व कवळा येथील दुकानचे कर्जाऊ रुपये आहेत तेंही तुह्मी अद्यापी दिले नाहींत. त्याचप्रमाणें आमचे पक्षकार व तुह्मी यांचे कवळा येथील भागणीचे दुकानांतून रकमा उचलून निराळें किराणा मालाचें दुकान काढले आहे त्याचाही हिशेब तुह्मांस देण्याविषयीं आह्मी ह्मटलें परंतु तुह्मी अद्याप त्याचाही हिशेब आह्मांस दिला नाहीं. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत तुमचे व आमचे पक्षकार यांचेमधील शराकतीचे दुकानचा हिशेब करून आमचे पक्षकार यांचा हिस्सा आमचे पक्षकार यांस द्यावा व तुमचेकडे आमचे पक्षकार याचे उंद्री दुकानचे येणें तुमचेकडे असलेले रुपये व कवळा दुकानचे येणें असलेल रुपये आमचे पक्षकार यांचे उंद्री येथील दुकानीं व कवळा येथील दुकानीं आणून द्यावे व तुह्मी काढलेले किराणा दुकानचा हिशेब द्यावा तसे न केल्यास कायदेशीर इलाज केले जातील व या नोटिशीचा खर्च व आमचे पक्षकारास तुमचे विरुद्ध दिवाणी फौजदारी मुकदमे करणे भाग झाल्यास त्याना सर्व खर्च तुह्मांस द्यावा लागेल. क. ता. २१।१।१९१६

सही

रामकिसन रामरतन व रामचंद्र कन्हय्यालाल तर्फे वकील

P. B. Gole Akola

नो नं. ४६

## मध्यप्रांत वार-- रिलीफ असोशियेशन.

### (वऱ्हाड शाखेचा दिसेंबर महिन्याबद्दल हिशेब.)

वरील संस्थेचे वऱ्हाड शाखेचे आकडे आमचेकडे प्रासिद्धीकारितां आले आहेत. त्यांवरून पाहतां जमेचे बाजूस जिल्हेवारीनें:—

| | उमरावती. | आकोला. | बुलडाणा. | यवतमाळ. |
|---|---|---|---|---|
| मागील शिल्लक. | ४६८-२-६ | २५१३०-११-९ | १२०९-४-१० | ३७१-४-११ |
| चालूं माहिन्यांत वसूल आलेली रकम. | ११७६-१३० | ४८१-०-० | ५२०-०-० | २४०-१३-० |
| सैन्यास सुखोपयोगीं सामान पुरविण्यासाठीं. | ६८-२-० | २८१-४-० | ३५५-०-९ | २१-२-६ |
| कलकत्ता यंगमेन ख्रिश्चन असोशियेशन करितां. | ७५-०-० | ०-०-० | ०-०-० | ०-०-० |
| बेल्जम रिलीफ फंडाकारितां | ३६-०-० | ० ०-० | ०-०-० | ०-०-० |
| सिमला येथील सेंट जान अँब्युलन्स असोशियेशन करितां. | ७५-०-० | ५००-०-० | ०-०-० | ०-०-० |
| मुंबई आरमारी रिलीफ फंडा करितां. | ०-०-० | १००-०-० | ०-०-० | ०-०-० |
| आफिस खर्च. | १-०-० | ४६-०-० | ०-०-० | ०-०-० |
| माहिना अखेर शिल्लक. | १३८९-१३-६ | २४६८४-७-९ | १३७४-४-१ | ५९०-१५-५ |

## कापुस– तक्ता– साप्ताहिक– ८ जानेवारी १९१६ पयत

| जिल्हा. | वर्ष. | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या. | | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या. | |
|---|---|---|---|---|---|
| | | ८-१-१६ पर्यंतचा आठवडा | १।९।१५ पासून | ता. ८।१।१६ पर्यंतचा आठवडा | १।९।१५ पासून |
| उमरावती | चालूं साल | १४,२४५ | ११३३११ | ६४६ | २,९४१ |
| | गुदस्त | ४,८०१ | ४१,२६२ | १४१ | ९२९ |
| | तिगस्त | १०,८०६ | ७२,७९३ | ३९७ | ३,८३६ |
| यवतमाळ | चालूं साल | २,०८० | २०,४३० | १,५७८ | ७,४३६ |
| | गुदस्त | ३,८४० | २०,४११ | ४७२ | २,५६० |
| | तिगस्त | ३,७११ | ३१,३७० | ४६४ | २,५१६ |
| आकोला | चालूं साल | १६,९३४ | १२८६४३ | ५६८ | २,४५५ |
| | गुदस्त | १८,०३४ | ६३,७४५ | ४३९ | १,३९६ |
| | तिगस्त | १८,२९६ | १०८४११ | १,४३५ | ६,६७६ |
| बुलडाणा | चालूं साल | १७,५२२ | ११४९६६ | ४३७ | १,६१७ |
| | गुदस्त | १६,८७० | ६३,४४५ | १८४ | ५८३ |
| | तिगस्त | १२,८१४ | ८५,६८५ | १,२८० | ५,९३३ |
| एकूण वऱ्हाड | चालूं साल | ५०,७८१ | ३७७३५० | ३,२२९ | १४,४४९ |
| | गुदस्त | ४३,५४५ | १८८८६३ | १,२३६ | ५,४६८ |
| | तिगस्त | ४५,६२७ | २९८२५९ | ३,५७६ | १८,९६४ |

टीप— चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे ९ जानेवारी १९१५ व १० जानेवारी १९१४ पावेतों होते.

सी. नी. लेस्टवीच

डायरेक्टर ऑफ अग्रिकलचर आणि इंडस्ट्रीज मध्यप्रांत

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला---सोमवार तारीख ३१ माहे जानवारी सन १९१६ ई० [ अंक ५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल. ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं सयताचे मागेंराहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट
नं १

### अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. ।॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन माय्फळाशीं काहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनखी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### अतिशय पौष्टिक व स्तंभक
### विलासिनी वटिका.

शक्ती येण्याकरितां व ती कायम टिकण्याकरितां एकदां वापरा. पहिल्याच दिवशीं गुणाबद्दल औषध घेणाराची खात्री. किं० बाटलीस १२ आणे. पूर्ण गुणास ३ बा. अ. पत्रक सोबत.

सकळकळे अन्ड सन्स
शहर आकोला.

त्वरा करा. **जंगी लूट** अपूर्व लाभ
**जानेवारी अखेर खर्च माफ.**

उत्तम रंगदार निळीकाळी शाईच्या पुड्या पाव आणा दराच्या १०० रु. १। डायरी बक्षिस. पुडी २०० रु. २। कापडी डायरी. पुडी ४०० रु. ४ डायरी सोनेरी. इनाम न घेतां १००० पुडीस रु. ७॥

**गुण न आल्यास पैसे परत.**

वृद्धपण टाकून तरुणत्व प्राप्त करून घ्या.

### तरुण मित्र पाक

किं० २ रु०

केस काढणारा रमेश सोप ३ वड्यांचे पेटीस रु. १ दोन पेट्यास १॥। रु. चार पेट्यास रु. ३ आग न होतां डाग पडणार नाहीं. उत्तम सुवासिक आहे.

**पत्ता** — दयालदास लालदास आ. कं.
जंगी स्टोअर बऱ्हाणपूर
नो. नं ५

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः**— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय,
सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

### श्री दत्तात्रय अलंकारालय
### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकणीं, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें ग्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं. चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

## कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह**
**पृष्टसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, लंगोटे, छाछू करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकविलासणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ब्रह्मादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशीकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वैगरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया. ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

